# मा. विशेष महासभा
# दि. १६/०४/२००७
# मिरा भाईंदर महानगरपालिका

महापालिका सभागृह कार्यालय,
तिसरा मजला,
दि. १६/०४/२००७

आज दि. १६/०४/२००७ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष महासभा दुपारी ४.०० वाजता सभा सुचना क्र. ०२ दि. १०/०४/२००७ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीम. निर्मला बाबुराव सावळे | महापौर |
| २) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | उपमहापौर |
| ३) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सभागृह नेता |
| ४) | श्रीम. संगिता विजय म्हात्रे | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| ५) | श्री. चिंतामण कमलाकर पाटील | सभापती, गलिच्छ वस्ती निर्मुलन समिती |
| ६) | श्री. अनंत रामचंद्र पाटील | सदस्य |
| ७) | श्री. ठाकुर नितिन गोपीनाथ | सदस्य |
| ८) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | गटनेता |
| ९) | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| १०) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ११) | श्रीम. करंबेळे प्रियांका प्रकाश | सदस्या |
| १२) | श्री. रोहिदास शंकर पाटील | गटनेता |
| १३) | श्रीम. पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १४) | श्री. भुदेका शिवप्रकाश प्रल्हादराय | सदस्य |
| १५) | श्री. भोईर गजानन लक्ष्मण | सदस्य |
| १६) | श्री. पांडे हंसु कमलकुमार | गटनेता |
| १७) | श्रीम. पाटील लिला गुरुनाथ | सदस्या |
| १८) | श्री. पाटील प्रफुल्ल काशिनाथ | सदस्य |
| १९) | श्री. पाटील जयंत महादेव | सदस्य |
| २०) | श्री. घरत केशव रामभाऊ | सदस्य |
| २१) | श्री. भोईर सुर्यकांत अनंतराव | सदस्य |
| २२) | श्रीम. सुरेखा यशवंत गायकवाड | सदस्या |
| २३) | श्री. मोदी चंद्रकांत भिकालाल | सदस्य |
| २४) | श्री. खान शफीक अहमद | सदस्य |
| २५) | श्रीम. सय्यद नुरजहाँ नझरहुसेन | अध्यक्षा, प्रभाग समिती क्र. ०४ |
| २६) | श्रीम. उमा विश्वनाथ सपार | सदस्या |
| २७) | श्रीम. फॅरो ग्रिटा स्टीफन | सदस्या |
| २८) | श्री. कुरेशी याकुब इस्माईल | सदस्य |
| २९) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| ३०) | श्री. घोन्सालवीस जोजफ जॉन | सदस्य |
| ३१) | श्री. शशिकांत रतिलाल शहा | सदस्य |
| ३२) | श्रीम. शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ३३) | श्री. पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सदस्य |
| ३४) | श्रीम. नरावत भवरीकुंवर चेनसिंह | सदस्या |
| ३५) | श्री. पाटील रतन कृष्णा | गटनेता |
| ३६) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| ३७) | श्रीम. गोयंका सुधा लक्ष्मीकांत | सदस्या |
| ३८) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | गटनेता |

| | | |
|---|---|---|
| ३९) | श्रीम. मुक्ता प्रविण रांजणकर | सदस्या |
| ४०) | श्री. प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| ४१) | श्रीम. नाईक शुभांगी सिताराम | सदस्या |
| ४२) | श्री. मेहता नरेंद्र | सदस्य |
| ४३) | श्री. तुळशिदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ४४) | श्रीम. जानी कैलासबेन दिनेशचंद्र | सदस्या |
| ४५) | श्रीम. शाह रक्षा एस. | सदस्या |
| ४६) | श्री. दुबोले प्रकाश शंकर | नामनिर्देशित सदस्य |
| ४७) | श्री. पांगे संजय नारायण | नामनिर्देशित सदस्य |
| ४८) | श्री. सुवर्णा रोहित मोहनचंद्र | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मेन्डोसा स्टिवन जॉन | सभापती, स्थायी समिती |
| २) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |
| ३) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ४) | श्री. शेख आसिफ गुलाब | सदस्य |
| ५) | श्री. तिवारी सुरेंद्रप्रसाद मुरलीधर | सदस्य |
| ६) | श्री. अग्रवाल ओमप्रकाश गंगाधरजी | सदस्य |
| ७) | श्रीम. गोहिल शानु | सदस्या |
| ८) | श्री. सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ९) | श्री. नलावडे दिनेश दगडू | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०३ |
| १०) | श्रीम. पाटील सुनिता कैलास | सदस्या |
| ११) | श्री. रविंद्र भीमदेव माळी | गटनेता |
| १२) | श्रीम. हसनाळे ज्योत्स्ना जालिंदर ऊर्फ शिंदे पुजा प्रताप | सदस्या |
| १३) | श्रीम. वाडे जिवी हिरा | सदस्या |
| १४) | श्री. गावंड आत्माराम बाळाराम | सदस्य |
| १५) | श्रीम. अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| १६) | श्री. म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| १७) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| १८) | श्रीम. जयाबाई यशवंत भोईर | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| १९) | श्री. आसिफ गुलाम पटेल | सदस्य |
| २०) | श्री. रोहिदास आत्माराम पाटील | सभापती, आरोग्य परिरक्षण समिती |
| २१) | श्री. पाटील अशोक पांडुरंग | सदस्य |
| २२) | श्री. कोलासो लिओ इजिदोर | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०१ |
| २३) | श्रीम. ऊर्मिला कोमल भामरे | सदस्या |
| २४) | श्री. कोलासो जेम्स इजिदोर | सदस्य |
| २५) | श्रीम. जैन गिता भरत | सदस्या |
| २६) | श्री. रॉड्रिक्स मॉरस जोजफ | सदस्य |
| २७) | श्रीम. चौहाण महेंद्रसिंग | अध्यक्ष, प्रभाग समिती क्र. ०२ |
| २८) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| २९) | श्री. पाटील मिलन गोविंदराव | सदस्य |
| ३०) | श्री. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३१) | श्री. ठाकूर प्रकाश पांडुरंग | नामनिर्देशित सदस्य (सभापती, शिक्षण मंडळ) |
| ३२) | श्री. टेरी पॉल परेरा | नामनिर्देशित सदस्य |

**रजेचा अर्ज दिलेले सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. पाटील परशुराम दामोदर | विरोधी पक्षनेता |
| २) | श्रीम. गोविंद हेलन जॉर्जी | सभापती, पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती |
| ३) | श्रीम. मेंडोंसा मायरा गिल्बर्ट | प्रथम महापौर |
| ४) | श्रीम. पाटील भानु भगवान | सदस्या |

(नगरसचिवांनी विषयपत्रिकचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १३ चे वाचन केले.)

(सन्मा. सभागृह नेते श्री. हॅरल बोर्जीस ह्यांनी प्रकरण क्र. १३ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**रिटा शाह / एस. ए. खान :-**

ठरावाला अनुमोदन आहे.

**रिटा शाह :-**

अनुमोदन आहे आणि अनुमोदन करताना सदर ३५ एम.एल.डी. पाण्यासाठी आपले स्थानिक आमदार मा. मुझफ्फर हुसैन साहेबांनी जे पोटतिडकीने प्रयत्न केले आणि त्याच्यावर मा. श्री. अशोक चव्हाण साहेब आणि आपल्या राज्याचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेबांनी स्वतः लक्ष घालून मिरा भाईंदर क्षेत्रासाठी ३५ एम.एल.डी. चे पाणी आपल्याला पास करुन दिले त्याच्याबद्दल मा. मुझफ्फर हुसैन, आमदार तसेच मा. श्री. विलासराव देशमुख आणि मा. श्री. अशोक चव्हाण साहेबांना मी धन्यवाद देते आणि अभिनंदन करत आहे.

**रोहिदास पाटील :-**

हा ठराव झालेला आहे. अभिनंदन झालेले आहे. चांगले काम आहे म्हणून सर्व सभागृह त्याचे स्वागत करेल. ज्यांना होर्डिंग लावायचे आहे ते होर्डिंग ही लावू शकतील पण यात मुद्यांचा विषय असा आहे की, जेव्हा या रक्कमेला आपण मंजुरी देतो. आवश्यक असेल तर त्याच्यापेक्षा जास्त रक्कमेला ही सभागृह मंजुरी द्यायला अडचण करणार नाही. पण मी असे जाणू इच्छितो की, ह्याच्यातले कोणी एक डिझाईन बनवल त्याला सॅक्शन कोणते, तर फक्त पाणी द्या एवढेच सॅक्शन आहे की, डिझाईनला सॅक्शन आहे. त्याच्या डिझाईनच्या ॲक्झीबिशेनचा काय पिरीयड आहे का? ते कोणती एजन्सी पूर्ण करणार आहे, ह्याची काय माहिती आहे का? त्याच्यात गांर्भीयाने एक अट लिहलेली आहे. तुम्हाला महाराष्ट्राच्या औद्योगिक विकास मंडळाचे पत्र दिलेले आहे. ११ एप्रिल चे जे पत्र आहे ते तुमच्याकडे पोहचल्याची तारीख ११ एप्रिलच आहे. त्याचदिवशी ते पत्र आपल्याकडे आले आहे. महामंडळाच्या पाण्याच्या आरक्षणात पाटबंधारे विभागाने यापुढे कपात केली तर सर्वप्रथम मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठ्यात कपात करण्यात येईल व त्याबाबत महानगरपालिकेची तक्रार राहणार नाही. याचा आपण कोणीतरी गांर्भीयाने विशेष विचार केला आहे का? की एका बाजूने योजना पूर्ण होते. आपण आवश्यक त्या खर्चाला मंजुरी देतो. कदाचित ते काम ही वेळेत पूर्ण होईल असे धरा. टेक्नीकली ते ओके आहे की, काय आहे हे आम्हाला तर माहित नाही आणि त्याचवेळी जर कपातीचा विषय आला तर त्याच्यातून आपल्याला कुठे नक्की धोका, दगाफटका अशी होण्याची शक्यता आहे की, काय?

**मा. आयुक्त :-**

या संदर्भामध्ये मी खुलासा करतो की, महामंडळाला जो वाढीव पाणी पुरवठा म्हणजे कच्चं पाणी डॅममधून उचलण्यासाठी मा. मंत्री महोदय, पाटबंधारे विभाग, यांच्याकडे जी बैठक झाली त्या बैठकीचे इतिवृत्त सुध्दा आपल्याकडे आहे आणि त्याच्यामध्ये त्यांनी मान्य केलेले आहे की, आम्ही ३५ एम.एल.डी. पाणी एम.आय.डी.सी. ला कच्चं देणार आणि ३० एम.एल.डी. पाणी औद्योगिक एम.आय.डी.सी. च्या पत्रामध्ये नमुद केल्याप्रमाणे ३० एम.एल.डी. पाणी ते मिरा भाईंदर शहराला देणार आहे.

**रोहिदास पाटील :-**

ते बरोबर आहे. पण ती जी अट आहे. ते पाणी देणार हे मंजुर केले आणि मंजुर केल्याशिवाय देणार नाही. हे ही त्रिवार सत्य आहे. पण असा जो घाईघाईचा ठराव आला होता. आता सन्मा. सदस्य मोहन पाटील हे सभेत नाही आणि त्यांच्या अनुपस्थितीमध्ये बोलणे बरोबर नाही. त्याचवेळी नवी मुंबईचे कोणते तरी पत्रं वाचून दाखविले होते की, त्याच्यात काही तथ्य नव्हते आणि ते खरं ठरले की, त्याच्यात काही तथ्यच नव्हते. आम्ही ह्याच्यावर शंका व्यक्त करत नाही. हे जितक्या लवकर चालू करता येईल तितक्या लवकर पाणी येणं गरजेचे आहे त्यासाठी ही सभा मंजुरी देत आहे. पण जे एक वाक्य आहे, त्याचा खुलासा होणे नक्की गरजेचे आहे. अन्यथा आपली योजना पूर्ण होते होते आणि कदाचित पाणी टंचाई लागू झाली किंवा तांत्रिक बाब उभी राहिली आणि पाटबंधारे खात्याने औद्योगिक एम.आय.डी.सी. ला पाणी द्यायला नकार दिला तर पहिले पाणी आपले बंद होईल याकडे आपले लक्ष राहिले पाहिजे किंवा ह्याच्यामध्ये कुठे तरतुद आहे ते तुम्ही बघा. मला अस वाटते की हे वाक्य खोडा. जितकी शक्ती लावता येईल त्यानुसार आजच्या सभेचे एक भावना किंवा तसा ठराव द्या की, हा ६ नंबरचा कॉलम तुम्ही काढा. पाटबंधारे विभागाकडे भरपूर पाणी आहे. एम.आय.डी.सी. कडे ही पाणी आहे आणि एम.आय.डी.सी. चे पाणी कुठे वापरायचे आणि महागाच्या दराचे पाणी कोणी घेत नाही अशी स्थिती आहे. पण आपल्याला त्याची जाणीव आहे की, नाही. हे मला माहित नाही. पण तरी आपल्याकडे पाणी नाही म्हणून पाणी मिळते व ते महागाचे असले तरी आपण घ्यावे. पण हा आयटम काढायला पाहिजे असा सभेचा एकमताचा ठराव आपण घ्यावा. ठराव कोणाला लिहायचा असेल तरी तुम्ही म्हणता की, आम्हीच मांडू. जे खरे आहे ते सांगतो. याच्यासाठी आपले सत्ताधारी पक्षाचे जसे सन्मा. रिटा शाह बोलल्या की, आमदारांचे अभिनंदन, आम्ही त्यांचे अभिनंदन योग्यवेळी करतो. ते त्यांनी करुन आणावे, हा शब्द काढून आणावा. नाहीतर हे आपल्याला घातक आहे.

**मा. उपमहापौर :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलत आहे की, या विषयात जेव्हा चर्चा झाली. आयुक्त महोदय, श्री. बारकुंड साहेब आणि आम्ही मंत्री महोदयाच्या दालनामध्ये असताना ही चर्चा झाली होती. तेव्हा आमच्याकडे जर काहीच अडचण निर्माण झाली तर ते रॉ वॉटर एम.आय.डी.सी. कडे येणार आणि एम.आय.डी.सी. कडून आपल्याला प्युअर वॉटर मिळणार. परंतु, त्याच्यामध्ये जर त्यांना अडचण झाली जशी आपण एन.ओ.सी. देताना सदर बाबत तक्रार आल्यास सदरची एन.ओ.सी. रद्द करण्यात येईल. असा कलम टाकतो त्याप्रमाणे त्यांनी एक कलम टाकलेला आहे. ते फार सिरीयस नाही.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते की, सन्मा. सदस्य रोहिदास पाटील ह्यांनी जी शंका उपस्थित केली ती कुठेतरी आपल्याला बोचणारी आहे, लागणारी आहे. आपण एवढे पैसे मोजणार तर निश्चितपणे त्याचा आपण विचारही केला पाहिजे. परंतु, मला असे वाटते की, एवढे काही घाबरण्यासारखे कारण नाही. महाराष्ट्र शासन हे संपूर्ण भारतातले एक सक्षम शासन आहे. आमचे मुख्यमंत्री दमदार आहेत. मा. श्री. अशोक चव्हाण साहेब दमदार आहेत आणि आमचा प्रश्न मांडणारे आमचे आमदार ही दमदार आहे आणि जे दमदारपणे येथे करुन आणलेले आहे. त्याच्यामध्ये फारसा काही फरक पडेल आणि त्यातून पडला, आपले आरक्षणे कमी केले गेले तर आपले नगरसेवकसुध्दा काही दमदार नाही असे मी सांगते. आपण सगळेजण तिथे भांडू.

**रोहिदास पाटील :-**

आमदार आणि सरकार टिकणार नाही असे नाही. पण ज्यापध्दतीने आपण बोलता तर तुम्हाला मी आकडे मोजून सांगतो की, दमदार मुख्यमंत्र्यांनी दि. ०३/०६/२००६ रोजी ..........

**प्रभात पाटील :-**

माझे निवदेन पूर्ण होउ द्या. मी मधे बोलत नाही. या दमदार शासनाचे, दमदार पत्र आपल्याला आहे. आपली वाढती गरज लक्षात घेता या शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढणार नागरीकरण लक्षात घेता त्यांनी आपल्या पाणी प्रश्नाला फार लवकर मंजुरी दिलेली आहे. ज्यापध्दतीने, ज्या कालावधीमध्ये आपण हा प्रश्न मांडला होता. त्या कालावधीच्या आतच म्हणजे त्यांनी फार जवळच्या काळामध्ये मंजुरी दिलेली आहे. मा. मुख्यमंत्री, मा. अशोक चव्हाण साहेब आणि मा. मुझफ्फर हुसैन ह्यांचेसुध्दा मी पुन्हा एकदा अभिनंदन करते आणि त्यांच्यासाठी फक्त दोन ओळी बोलते.

हमने चाँद और सितारोकी तमन्ना की थी
मगर वह चाँद सितारो के साथ बहार भी ले आए।
अब बादल सब आ, अब भी ना लाए तो क्या?
(सभागृहात गोंधळ.)

**रोहिदास पाटील :-**

मी मा. महापौरांचे आणि मा. उपमहापौरांचे लक्ष वेधू इच्छितो की, मॅडम बोलल्या की, काँग्रेसने आणले मग राष्ट्रवादीने काय विरोध केला आहे का?

**हॅरल बोर्जीस :-**

सन्मा. सदस्या रिटा शाह मॅडम ह्यांनी सन्मा. मुख्यमंत्र्यांचे, मा. ना. अशोक चव्हाण साहेबांचे याठिकाणी धन्यवाद व्यक्त केलेले आहे. त्यावेळेला सुध्दा मला थोडेसे अपेक्षित होते की, कदाचित त्यांच्या तोंडून अजितदादा पवारांचे नांव पुढे येईल. परंतु, ते आले नाही. ठिक आहे. या सभागृहामध्ये, या राज्यामध्ये आघाडी सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे मा. ना. अजितदादा पवार ह्यांचेसुध्दा याकामी मोलाचे श्रेय आहे.

**रतन पाटील :-**

पक्षाचे मंत्री असले तरी सर्वजणांचे मत्री आहेत. फक्त पक्षांचा नाही सर्वांचा आहे असे घ्या. विरोधकाचे सुध्दा नांव घ्या.

**रिटा शाह :-**

मा. महापौर मॅडम, सन्मा. सभागृह नेते साहेबांनी सांगितले की, मी मा. ना. अजितदादा पवार आणि मा. आर. आर. पाटील ह्यांना विसरली आहे. पण त्यांना आठवण नाही की, मागच्या सभेमध्ये या दोघांचे नांव पहिले घेतले होते आणि मा. विलासराव देशमुख, मुख्यमंत्री साहेब आणि मा. आमदार मुझफ्फर हुसैन व मा. ना. अशोकराव चव्हाण साहेबांचे नांव मी नंतर घेतले होते आणि बोलताना मी बोलले होते की, राष्ट्रवादी पक्ष आपल्या बरोबर सहभागी आहे. एलाईन्स आहे. परंतु, जेव्हा होर्डिंग्स लावले आणि प्रचार केला तेव्हा नेमके मा. विलासराव देशमुख, मुख्यमंत्री साहेबांना, मा. मुझफ्फर हुसैन साहेबांना आणि मा. अशोकराव चव्हाण साहेबांना विसरले. परंतु, आम्ही तसल्या मधले नाही म्हणून मी ह्या लोकांच्या पूर्वी त्यांचे अभिनंदन करते आणि आज मी मुद्दामहून त्यांचे नाव काढले. कारण आम्ही त्यांना फक्त असा सबब देवू इच्छितो की, आम्हाला सर्व आठवण असते पण आम्ही विसरत नाही. परंतु, आम्ही जे केले ते तुम्हाला जसे टोचले तसे आम्हालाही तसे टोचले होते.

**प्रफुल्ल पाटील :-**

सन्मा. पिठासीन अधिकारी ह्यांच्या परवानगीने बोलतो सर्वप्रथम मा. मुख्यमंत्री, उद्योगमंत्री, मा. जलसंपदा मंत्री आणि मा. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री आणि आमचे आमदार तसेच मा. महापौर मॅडम आणि मा. उपमहापौर साहेब या सर्वांना मी धन्यवाद देतो की, महानगरपालिका पातळीपासून ते राज्य शासनापर्यंत सर्व ॲथोरिटीजनी तसेच आयुक्त साहेब यांनासुध्दा विशेष धन्यवाद देतो. महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाचे पत्र वाचल्यानंतर काही शंका मनामध्ये उपस्थित होतात. कारण एक अनुभव आमच्या पाठीशी आहे. मा. गणेश नाईक साहेब हे जेव्हा पूर्वी मंत्री होते त्यावेळेला १० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना आम्हाला मंजुर झालेली होती त्यावेळी शहराला फक्त २१ एम.एल.डी. पाणी मिळते आणी १० एम.एल.डी. पाणी मिळाल्यानंतर आम्ही सगळे आनंदीत होतो. सर्वांनी त्यांचा सन्मान केला, सत्कार केला आणि खरोखर त्यांनी १० एम.एल.डी. पाणी मंजुर केले होते. परंतु, एम.जी.पी. ने आमच्याकडून त्या योजनेची कॉस्ट होउनसुध्दा या शहराला पाणी काही मिळाले नव्हते. जेव्हा त्या योजनेचा नंतर शोध घेतला की, खरोखर या योजनेमध्ये किती कामे झालं तेव्हा आम्हाला असे आढळून आले की, पातली पाड्यापासून ती ओवळ्यापर्यंत ५०० एम.एम. ची जी पाईप लाईन टाकायची होती त्याच्यामध्ये १० एम.एल.डी. पाणी मिळणार होते ती पाईप लाईनच टाकली गेली नव्हती हे जेव्हा लक्षात आले तेव्हा एम.जी.पी. कडे आम्ही त्या रक्कमेची मागणी केली आणि एम.जी.पी. चे धाबे दणाणले. मग त्यांनी हे कबुल केले की, आम्ही ही पाईप लाईन टाकलेली नाही. तुमच्या अस्तित्वात असलेल्या पाईप लाईनमधून आम्ही तेवढे पाणी देतो. मग तुम्ही एवढे पाणी देता ते आम्हाला सिध्द करुन दाखवा आणि त्यावेळी मीटर बसवण्यात आले. तेव्हा पहिल्या दिवशी फक्त १८ एम.एल.डी. पाणी आले आणि त्याठिकाणी १० एम.एल.डी. जास्तीचे पाणी शहरात कधीही आले नाही. मग त्याच्यानंतर त्यांनी त्या पाईप लाईनमधून पाणी वाढवल तेव्हा कुठे २८ एम.एल.डी. पाणी आम्हाला यायला लागले ३१ एम.एल.डी. मध्ये प्रिशनल लॉस ३ एम.एल.डी. गेले आणि २८.५ एम.एल.डी. साधारण पाणी या शहराला मिळायला लागले. ५० एम.एल.डी. पाण्याची योजना साकार झाली. आता ३० एम.एल.डी. पाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने आपल्याला सॅक्शन केलेले आहे. पण त्यांनी ज्याकाही अटीशर्ती टाकलेल्या आहेत त्या अटीशर्तीचे वाचन केल्यानंतर आपल्याला स्वतःला वाटेल की, आपण ह्याच्यामध्ये काहीतरी खबरदारी घेतली पाहिजे किंवा आपण काहीतरी उपाययोजना केली पाहिजे. याच्यामध्ये त्यांनी पहिली अट अशी टाकलेली आहे की, हे पाणी महामंडळातर्फे उल्हास नदी वरुन जांभूळ येथे उचलण्यात येईल आणि मिरा भाईंदर महानगरपालिकेला साकेत याठिकाणी जांभूळ पासून ४० कि.मी. वर ते पाणी देणार आहेत. साकेत याठिकाणी जेव्हा पाणी येईल तेव्हा प्रिशनल लॉस होउन ३५ एम.एल.डी. चे ३० एम.एल.डी. पाणी आपल्याला मिळेल पण यांनी साकेत याठिकाणी पाणी देवू असे म्हटलेले आहे. मगाशी, आयुक्त साहेबांच्या सोबत श्री. बारकुंड, इंजिनिअर यांच्या सोबत चर्चा केली तेव्हा त्यांनी सांगितले की, साकेत येथे पाणी न घेता आपण कापूरबावडीला घेणार आहोत. तरीसुध्दा समीकरणे बदलतात. मग त्याच्यावर प्रोजेक्ट कॉस्ट ३ कोटी ८० लाख रुपये जी दाखवलेली आहे. त्याच्यामध्येसुध्दा फरक होण्याची शक्यता आहे. पहिल्यांदा प्रशासनाने याठिकाणी स्पष्ट करावे की, महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाने साकेत याठिकाणाहून तुम्हाला पाणी देण्याचे कबुल केलेले आहे आणि तुम्ही म्हणता की, ते पाणी आम्ही कापूरबावडी येथे घेउ. तर खरे काय आहे? जर ते तुम्हाला कापूरबावडीला पाणी देणार असतील तर तशाप्रकारे त्यांच्या मंजुरीचे पत्र आहे का? हा एक मुद्दा उपस्थित झाला. दुसरा मुद्दा त्यांच्या अटीतूनच दिसतो. त्यांनी दुसरी स्पष्ट अट घातलेली आहे की, महामंडळाच्या जलवाहिनीवर उंदणजण, भुष्टींग करण्याची परवानगी देता येणार नाही. कारण त्यामुळे महामंडळाच्या हितावर ग्राहाकांच्या पाणीपुरवठ्याावर परिणाम होईल. साहेब, हा फार मोठा मुद्दा आहे. पूर्वी शांतीनगरला एम.आय.डी.सी. ५ एम.एल.डी. पाणी पुरवठा करीत होती. माझ्या नगराध्यक्ष पदाच्या कारकिर्दीत शांतीनगरमध्ये बऱ्याचवेळा आंदोलने झाली. जिल्हाधिकारी साहेबांनी एम.जी.पी. च्या अधिकाऱ्यांची आणि एम.आय.डी.सी च्या साहेबांची सभा लावली. शांतीनगरला पाणी पुरवठा का होत नाही? आणि जो पाणी पुरवठा होतो तो पाणी पुरवठा किती प्रमाणात होतो? ह्याची चौकशी सुरु केली. त्यावेळी सन्मा. सदस्य याकुब कुरेशी हे पाणी पुरवठा विभागाचे सभापती होते. तेसुध्दा त्याठिकाणी उपस्थित होते. जिल्हाधिकारी साहेबांना असे सांगण्यात आले की, ५ एम.एल.डी. पाणी ऐवजी अडीच एम.एल.डी. पाणी एम.आय.डी.सी. देते. अडीच एम.एल.डी. पाणी एम.आय.डी.सी. देत नाही. म्हणजे एम.आय.डी.सी पाणी कमी प्रमाणात देते. तर त्याच्यावर उपाययोजना काय करावी? तर त्यावर एम.आय.डी.सी च्या अधिकाऱ्यांनी अशी सुचना योजना सुचविली की, एम.आय.डी.सी च्या पाईप लाईन्सवर बुस्टर पंप बसवावा. आणि त्या बुस्टर पंपाने पाणी खेचून ते ५ एम.एल.डी. पाणी मिरारोडला मिळेल. तेव्हा मी जिल्हाधिकारी साहेबांच्या लक्षामध्ये टेक्नीकल मुद्दा आणला की, मिरारोड, शांतीनगरची पाईप लाईन ही एम.आय.डी.सी च्या पाईप लाईनवर जिथे जॉईन्ट केलेली आहे. क्रॉस कनेक्शन केलेले आहे. ते टेलेन्टवर आहे. एम.आय.डी.सी च्या पाईप लाईनवर ज्या दाबाने पाणीपुरवठा व्हायला पाहिजे तो होत नाही. फक्त दोन ते अडीच कि.ग्रॅ. स्केअर इंचाचे प्रेशर आहे आणि त्या प्रेशरमुळे पाणी पुढे जाणार नाही. गावठी भाषेत बोलायचे झाले तर आड्यात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार? अशापकारे उत्तम पंप जर तुम्ही लावलात तर तो स्पेशल फोल होईल. सन्मा. सदस्य श्री. याकुब साहेब त्यावेळी होते. आम्ही सांगितले की, तुमची बुस्टरची योजना पूर्ण सफल नाही. तरीसुध्दा त्यांनी ८ लाख रुपये

खर्च करुन बुस्टर लावला आणि याचा परिणाम असा झाला की, अडीच एम.एल.डी. च्या वर १ लीटरसुध्दा पाणी एक्स्ट्रा गेलेले नाही. बुस्टर लावण्याची योजना संपूर्णपणे एम.आय.डी.सी च्या टेक्नीकल अधिकाऱ्यांनी सुचवलेली होती. तरीसुध्दा ती योजना फेल झाली. आता याठिकाणी बुस्टर लावण्यासाठी जर तुमचा प्रस्ताव बुस्टर लावण्याचा असेल तर तुम्हाला बुस्टर लावता येणार नाही. असे त्यांनी म्हंटलेले आहे. माझ्या माहितीप्रमाणे साकेत येथे मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आणि ठाणे महानगरपालिकेची दोघांची मिळून एकच पाईप लाईन आहे. त्याच्यामध्ये ५० एम.एल.डी. पाणी मिरा भाईंदर शहराला आणि १०० एम.एल.डी. पाणी ठाणे शहराला मिळते. १५० एम.एल.डी. पाणी वाहून नेणाऱ्या पाईप लाईनची जी क्षमता आहे ती २००० एम.एम. च्या ढाई मिटरच्या पाईप लाईनचा आहे. त्याठिकाणी आपले प्रेशर जिथे पाईप लाईन आहे ते ६ कि.ग्रॅ. पर स्क्वेअर इंच इतके प्रेशर आहे. आणि जिथे त्या साकेतच्या ठिकाणी जिथे एम.आय.डी.सी. ची पाईप लाईन आलेली आहे. तिचा ढाई मीटर ५५० एम.एम. आहे. आणि त्याचे प्रेशर जे आहे ते २ कि.ग्रॅ. पर स्क्वेअर इंच पेक्षा जास्त नाही. त्याच्यामुळे तुम्हाला क्रॉस कनेक्शन करुन दिड करोडमध्ये पाणी देवू अशी जी पूर्वी वलगना केलेली होती. मी वलगना म्हणेन. आपल्याला मंजुरी दिली. मंजुरी दिलेल्या मंत्र्यांनी कुठलीही चुक केलेली नाही. त्यांनी बरोबर मंजुरी दिली. पाणी कसे द्यायचे? ह्या टेक्नीकल गोष्टी ठरवणाऱ्या ॲथोरिटी एम.जी.पी आणि एम.आय.डी.सी. आहेत. त्यांनी जर दिशाभूल करण्यास सुरुवात केली तर आपली काही खरी गत नाही. जेव्हा त्यांच्या लक्षात आले की, ह्या ठिकाणी प्रेशर फेल आहे. क्रॉस कनेक्शनची आयडिया सफल होणार नाही आणि आपण दिड कोटीमध्ये ३० एम.एल.डी पाणी मिरा भाईंदर शहराला देवू शकणार नाही. तेव्हा त्यांची बुस्टर लावण्याची जी आयडिया होती ती फेल गेली. आता याठिकाणी त्यांनी असे म्हंटले आहे की, तुम्ही बुस्टर लावा. पण तो साकेतच्या ठिकाणी लावू नका आणि त्यांनी असेही म्हंटलेले आहे की, बुस्टर लावल्यामुळे त्यांच्या पाईप लाईन्सवरती इतर जी कनेक्शन्स आहेत, त्याच्यावरचा दाब कमी होईल. असे त्यांनी जे म्हंटलेले आहे त्याचे कारण एकच आहे की, ज्याठिकाणी ४ कि.ग्रॅ. चे पर स्क्वेअर इंचला जे प्रेशर पाहिजे आहे. त्यांच्या पाईप लाईनमध्ये ऑलरेडी नाही. ते आता २ किंवा १.८ पर्यंतच आहे आणि जेव्हा आपण बुस्टर तेथे लावू किंवा आपल्यासाठी आपण पाणी कनेक्शन घेवू. पाणी घेण्यासाठी कनेक्शन लावू. तेव्हा त्यांच्या इतर कनेक्शनवरती त्याचा परिणाम होणार आहे. म्हणून त्यांनी अट घातलेली आहे. ही अट खुप जाचक आहे. मा. आयुक्त साहेब या अटीवर तुमच्या आमच्या ३० एम.एल.डी. पाणी पुरवठा योजनेचे भवितव्य अवलंबून आहे. हे तुम्ही लक्षात घ्या. कारण ते तुम्हाला सांगणार की, आम्ही तुम्हाला पत्र दिले. पत्र उशिरा का आले? मा. मंत्री महोदयांचे आदेश कधी आले होते? मग एम.आय.डी.सी. ला स्वतःलाच अनफिट आहोत असे वाटत होते का? की एम.आय.डी.सी. ला वाटत होते की, आपण टेक्नीकल दृष्ट्या हे देवू शकत नाही. म्हणून त्यांनी वर्षभर लांबणीवर टाकले. कारण त्यांच्याकडे पाणी मुबलक आहे. त्यांची पाणी देण्याची तयारी आहे. मग त्यांनी पत्र देण्यास एवढा वेळ लावला? पत्र दिले तर दिले. पण ह्या अटी त्यांनी घातल्या. ह्या अटींचा आपल्यावर काय परिणाम होणार आहे? जेव्हा याठिकाणी तुमचा निकष लागणार आहे. तुमची कसोटी ठरणार आहे की, तुम्ही कशापध्दतीने पाणी घेणार आहे? ते पाणी ज्यापध्दतीने सोडतील पण तुम्ही ते पाणी कशापध्दतीने घेणार? की तुम्ही ३० एम.एल.डी. पाणी या शहरापर्यंत आणू शकाल. तुम्हाला श्री. बारकुंड साहेबांनी जी कल्पना दिली की, आम्ही कापूरबावडीला कॅप्सुल करुन त्याठिकाणी ३५० एच.पी. चे दोन पंप बसवून ती आपण पाईप लाईनमध्ये आपल्या पाईप लाईनने ३० एम.एल.डी. पाणी खेचू. त्यांनी सांगितलेली ही टेक्नीकल गोष्ट एम.आय.डी.सी. ने आणि एम.जी.पी. ने दोघांनीही सर्टीफाय केली पाहिजे, प्रमाणित केली पाहिजे. तरच आपण ह्यामध्ये हात घालावा. अन्यथा आपण पैसे देवून बसाल आणि जशी १० एम.एल.डी. ची परिस्थिती झाली. तशी ही आपल्या ३० एम.एल.डी. ची परिस्थिती होईल आणि नाहक आपल्या शासनाला त्याची नामुष्की घ्यावी लागेल. कारण बदनामी होणार ती आमच्या आमदार साहेबांची, मुख्यमंत्र्यांची, पाणी पुरवठा मंत्र्यांची, जलसंपदा मंत्र्यांची त्यांना काही नाही. खरे म्हणजे त्यांनी ही मंजुरी दिल्यानंतर परफेक्ट टेक्नीकल आयडिया देवून त्याचे एक परफेक्ट डिझाईन तयार करणे जरुरी होते. एम.जी.पी. च्या अधिकाऱ्यांना एम.आय.डी.सी. च्या अधिकाऱ्यांना आज आपण इथे बोलावले पाहिजे होते किंवा अशाप्रकारचे आमचे तांत्रिक मुद्दे आहेत, तांत्रिक अडचणी आहेत आणि त्याच्यात तुम्ही त्यांच्या अटीशर्ती मंजुर केलेल्या आहेत. त्याचे उत्तर तुम्ही द्यायला पाहिजे. त्याच्यात त्यांनी असेही म्हटलेले आहे की, महामंडळाच्या जलवाहिन्या बदलण्याची किंवा दुरुस्त करण्याची कामे पूर्ण होईपर्यंत म्हणजे त्यांच्या महामंडळाच्या सगळ्याच जलवाहिन्या खराब झालेल्या आहेत. तुम्हाला एक स्पष्ट उदाहरण सांगतो की, चार वर्षापूर्वी उल्हासनगरला एक फार मोठे आंदोलन झाले होते. एम.आय.डी.सी. ची पाईपलाईन सडल्यामुळे उल्हासनगरच्या सर्व लोकांचे आरोग्य धोक्यात आले होते. फारमोठी रोगराई पसरलेली होती. त्यावेळी नागपूरच्या अधिवेशनामध्ये यावर लक्षवेधी झालेली होती आणि त्याच्यानंतर आरोग्य मंत्र्यांवर गदा आल्यानंतर आरोग्य मंत्र्यांनी सरळ-सरळ एम.आय.डी.सी. च्या मंत्र्यांवर ताशेरे ओढले होते. ही आमची चूक नाही. उल्हासनगरच्या लोकांचे आरोग्य धोक्यात आले ते केवळ एम.आय.डी.सी. ची पाईप लाईन आहे, ती सडलेली आहे. त्याची त्यांनी कुठेही देखभाल, दुरुस्ती केलेली नाही आणि त्याच्यामुळे ही संपूर्ण रोगराई उल्हासनगरमध्ये झालेली आहे. आता तीच एम.आय.डी.सी. त्याच ठिकाणाहून पाणी घेते. जांभुळ आणि त्यांचे पुढे दुसरे इन्टेक आहे. जांभुळच्या इन्टेकमध्येही हीच परिस्थिती आहे. आता त्यांनी स्वतःच असे म्हटलेले आहे की, आमच्या जलवाहिनींची दुरुस्तीची कामे सुरु आहेत आणि

ती दुरुस्तीची कामे पूर्ण होईपर्यंत तुम्हाला ३० एम.एल.डी. पेक्षा कमी पाणी पुरवठा होईल. किती पाणी पुरवठा होईल. ते सांगत नाही. दुरुस्तीची कामे किती आहेत? तेही सांगत नाही. दुरुस्तीची कामे पूर्ण होण्यास किती वेळ लागेल? ते ही सांगत नाही. अशा परिस्थितीमध्ये आपण पुन्हा एकदा एम.आय.डी.सी. च्या प्रॉपर अधिकार. प्रॉपर ॲथोरिटी यासाठीच बोलतो की, खालचे इंजिनिअर तुम्हाला काहीही आश्वासने देतील. पण, प्रॉपर ॲथोरिटीने जर एक्झीक्युटीव्ह इंजिनिअरने किंवा चिफ इंजिनिअर तुम्हाला अश्वासन दिले किंवा तुमच्याशी लेखी पत्रव्यवहार केला. तर त्याला काहीतरी वेटेज येईल. तेव्हा एम.जी.पी. च्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाच्या चिफ इंजिनिअर किंवा एक्झीक्युटीव्ह इंजिनिअरच्या स्तरावरच्या अधिकाऱ्यांबरोबर आपण एक बैठक लावावी. महापालिकेच्या गटनेत्यांची, महापौर, उपमहापौर यांच्यासोबत त्यांच्याशी एक बैठक लावावी आणि या अटीशर्तीबाबत आपण पूर्णपणे या ज्या शंका मी उपस्थित केलेल्या आहेत. त्या शंकांचे आपण निरसन करुन घ्यावे. अशी मी तुम्हाला विनंती करतो. त्यांनी जो रेट सांगितलेले आहे. ७/- रु. प्रती घनमीटर असा त्यांनी रेट सांगितलेला आहे. आता आपण १००० लीटरला ७/- रु. रेट लावतो. ह्यांचे पाणी घेतल्यानंतर आपल्या रेटमध्ये किती फरक पडणार आहे? आणि आपण नेमक्या कुठल्या लोकवस्तीला पाण्याचा हा वापर करु देणार आहोत? आणि त्या लोकवस्तीला मग आपण पाण्याचा सेपरेट रेट लावणार का? याचासुध्दा आत्ताच विचार करणे गरजेचे आहे. कारण एम.आय.डी.सी. चे पाणी जेव्हा शांतीनगरला मिळत होते. शांतीनगर जो काही रेट लावत होते. त्याबद्दल शांतीनगरच्या लोकांच्या फार मोठा आक्षेप होता. प्रत्येकवेळी त्यांनी सांगितले की, शांतीनगर बिल्डर हा त्याच्यावर प्रॉफिट कमावतो. एक तर तो पाणी कमी प्रमाणात देतो. पण, एम.आय.डी.सी.ज्या रेटने पाणी देते त्यापेक्षा जास्त प्रमाणात रेट आम्हाला लावण्यात येतो. तसे होउ नये म्हणून आम्हाला हा रेट ७/- रु. प्रती घनमीटर पर लीटर मागे का येतो? ह्याचे मी कॅलक्युलेशन केलेले नाही. आपण ह्योच कॅलक्युलेशन करुन ह्या पध्दतीने आपण कुठल्या भागाला हे पाणी देणार? आणि आपण कोणता रेट लावणार? याची आपण संबंधीत ंतरतुद केल्याशिवाय ह्याच्यापुढे आपल्या कामात सुव्यस्थता येणार नाही. तेव्हा मी आपल्याला मा. महापौर, मा. उपमहापौर, तसेच मा. आयुक्त साहेब मी आपल्याला विनंती करतो. पुन्हा धन्यवाद देतो की, आपण ह्यासाठी खुप मेहनत करीत आहात. सगळ्या गोष्टी असल्यातरी जेव्हा जनतेचे ३ कोटी ८० लाख रुपयांचे आपण खर्चाच्या योजनेमध्ये पडत आहोत. लोकांना आपण आश्वासने दिलेली आहेत आणि त्या आश्वासनांची पूर्ती आपण करित आहोत आणि पुर्ती करीत असताना केवळ ह्या अटीशर्ती जाचक होउन ती योजना कुठेतरी रखडता कामा नये. कारण मोरबे ड्यामच्या योजनेबाबत असेच झाले. ४०० कोटी रुपयांची योजना मंजुर झाली. माझ्या माहितीप्रमाणे यासाठी आपल्याकडून ४०० कोटी रुपयांचे टेंडरसुध्दा निघालेले होते. हीसुध्दा बाब माझ्या कोणीतरी लक्षात आणून दिली. मला खरे माहिती नाही की, ४०० कोटी रुपयांची पाण्याची योजना मंजुर झालेली आहे की नाही आणि आपल्याकडून टेंडर कशाप्रकारे निघाले? आणि टेंडर काढले ते कशाप्रकारे काढले? ह्याची माहिती कदाचित सभागृहाला देखिल नसेल. तर तशा पध्दतीने आपल्या कडून अशी टेंडर काढण्याची कार्यवाही जर सुरु झाली आणि ॲक्च्युअली सॅक्शन किंवा त्याच्याबरोबर ऐक्झ्युकेशन त्याच्यावर डिझाईन किंवा टेक्नीकल डाटा या सारख्या गोष्टी अस्तित्वात नसताना जर आपण ह्याच्यावर काम केले तर आपण नाहक बदनाम होउ आणि ज्यांनी मेहनत घेवून आपल्यासाठी पाण्याची योजना सॅक्शन केलेले आहे. त्यांचे आपल्यावर जे उपकार झालेले आहेत. आपण ते उपकार खरोखर फलित करण्यासाठी यशस्वी झालेलो आहोत. अशाप्रकारचे चित्र निर्माण होणार नाही. म्हणून आपल्याला पुन्हा एकदा धन्यवाद देवून आपण ह्या प्रकरणामध्ये खास विशेष लक्ष घालावे आणि ह्या अटीशर्तीबाबत पुन्हाएकदा वरिष्ठ स्तरावर अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये आपले, तसे करावे कारण त्यांनी पुढे करारनामे म्हटलेले आहेत की, करारनामा करुन द्यावा. त्याच्यानंतर कुठल्या प्रकारचे अकाउंट खोलावे हेसुध्दा त्यांनी दिलेले आहे. एस. क्रो. अकाउंट खोलण्याच्या सदंर्भात आपल्याला अट घातलेली आहे. त्याच्यानंतर तीन महिन्याच्या बिलाची रक्कम आपण डिपोझीट म्हणून द्यायची असे त्यांनी करारनाम्यात दिलेले आहे. परत विहित नमुन्यामध्ये करारनामा करावा असे सुध्दा दिलेले आहे. खरे म्हणजे आजच्या सगळ्या ठरावामध्ये ह्या सगळ्या गोष्टी नमुद करायला पाहिजेत की, करारनामा जर कराल तर तो करारनामा तुम्ही सभागृहासमोर आणाल की नाही? की, तुम्ही तसाच करारनामा करणार किंवा तीन महिन्यांची जी बिलाची रक्कम होती ती रक्कम साधारण किती होते ती इतकी होती. त्याची एक महिन्याच्या ॲडवान्समध्ये ह्या सगळ्या गोष्टींवर आपण पुन्हा एकदा लक्ष द्या आणि आपण कराव्यात अशी मी आपणांस विनंती करतो आणि ह्याच्यामध्ये टेक्नीकल बाबती माझ्याकडून काही सहकार्य लागले तरी मी कधीही तुम्हाला द्यायला तयार आहे. कारण तुमची ही पाण्याची योजना मिरा भाईंदर शहरासाठी आहे. ही कुठल्याही पक्षाने, कुठल्याही व्यक्तीने आणण्यापेक्षा आपण ह्या शहरासाठी राबवत आहोत. म्हणून प्रत्येक नगरसेवकांचे एक कर्तव्य राहील की, ह्या योजनेकडे पॉझेटीव्ह ॲपरोच ठेवावा. पॉझेटीव्ह ॲपरोच असावा या भावनेनेतूनच आम्ही वागू. असे मी तुम्हाला अश्वासन देतो आणि पुन्हा या सभागृहाला धन्यवाद देतो.

**मा. उपमहापौर :-**

सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, आपला याक्षेत्राबाबतचा अभ्यास आहे. आपल्या निवेदनामध्ये दोन-तीन गोष्टी खटकल्या त्याबाबतच सांगतोय की, गेल्या दि. ६ डिसेंबर २००६ रोजी नागपूर अधिवेशनामध्ये

ह्या विषयाला मंजुरी मिळालेली होती आणि त्याला अवघे चार महिने झालेले आहेत. आपल्या निवेदनात असे आले आहे की, १ वर्षापासून एम.आय.डी.सी. ला याच्याबद्दल शंका होती का? म्हणून त्यांनी आपल्याला.......

**प्रफुल्ल पाटील :-**

आपले दि. १२/१०/२००६ रोजीचे पत्र आहे.

**मा. उपमहापौर :-**

आपली मागणी होती. नागपूर अधिवेशनामध्ये हे मंजुर झाल्यानंतर. आपण जसे सांगितले की, आपल्याला मोरबे धरणातून रु. ४०० करोड रुपयांची योजना होती हे माझ्याही एकण्यात होते. आपली ५० एम.एल.डी. ची योजना ९४ कोटीची होती या सगळ्या तुलना मधून आपण पाहिले तर आपल्याला ५० एम.एल.डल.ची. योजना शहाड टेमघर मधून होती. तेथून आपल्याला ८६ एम.एल.डी. पाणी मिळते आणि सन २००० सालच्या जनगणनेनुसार ५ लाख ३० हजार ३०० लोकांना हे पाणी पुरेसे होते. आज जर साडे सात-आठ लाख लोकसंख्या असेल तर आपल्याला हे पाणी पुरेसे नाही. यावेळी आपल्याला हे पाणी झटकन मिळते. ते पण तीन-साडेतीन करोड रुपये आपली रक्कम लागते. कोणीही कोणाबरोबर करार कल्यानंतर त्या कराराला अटीशर्ती येतातच. आपल्याला एम.आय.डी.सी. कडून पाणी घ्यायचे आहे. तर आपला करार होणे स्वाभाविक आहे. ह्या करारामध्ये त्यांनी स्पष्ट दिलेले आहे की, दरवेळेला तेवढेच पाणी मिळेल असे सांगता येणार नाही. ह्या जरी गोष्टी असल्या तरी या शहराला पाण्याबद्दल जे दुरभिक्ष तयार झालेले होते. वातावरण खराब झाले होते. मागे मी कॉंग्रेसच्या सर्व नगरसेवकांना घेवून उल्हास नदीवर आम्ही व्हिजीट केली होती. त्या दिवसानंतर आमच्या पाहण्यात एक गोष्ट नक्की आली की, शहरामध्ये पाण्यासाठी जी बोंबाबोंब चालायची निश्चितच कुठेतरी कमी झाल्याची जाणीव आम्हाला झाली. अशाप्रकारे आपल्याला या ३५ एम.एल.डी. पाण्यातून ३० एम.एल.डी. पाणी मिळते की, २५ एम.एल.डी. पाणी मिळते? परंतु, त्याच्यामुळे मिरा भाईंदर शहराची पाण्याची गरज नक्कीच भागवली जाणार आहे. परंतु, अगामी भविष्यासाठी आपल्याला हे ही पाणी आपूरे पडेल. म्हणून यासाठी आपल्याला सभागृहामध्ये काही तज्ञ मंडळींना उदा. सन्मा. सदस्य श्री. रोहिदास पाटील (काका) सारख्या मंडळींनी, ज्यांचा या क्षेत्रामध्ये आभ्यास आहे. ज्यांचे योगदान या शहरामध्ये जास्त आहे. बरीच अभ्यासू मंडळी आहेत. त्यांनी आपल्याला अजून नवीन काही स्त्रोत निर्माण करता येतील का? याबाबत देखील आपली मते सादर करायला पाहिजे. कारण या पाण्यामध्ये अजून दोन वर्षात आपल्याला पुन्हा बोंबाबोंब ही करावी लागेल. सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, आपण एक गोष्ट सांगितली की, आपण हे पाणी कुठल्या विशिष्ठ क्षेत्रासाठी देणार आहोत? संपूर्ण शहरामध्ये पाण्याची टंचाई आहे. त्याच्यामुळे आपल्याला हे पाणी सगळीकडेच द्यावे लागेल. त्यात पाणी देताना आपले जे आज ७ रु. १० पैसे प्रती हजार लीटर दराने बिले आकारतो त्याच्याने अजूनपर्यंत आपला लॉस रिकव्हर झालेला नाही. आपण फायद्यात नाही. आपण फायद्याच्या जवळपास आलेलो आहोत. परंतु, आपण लॉसमध्येच आहोत. परंतु, या शहराला पाणी देणे, ह्या प्रत्येकाचा फंडामेन्टल राईट आहे. नैतिक अधिकार आहे. तो आपल्याला द्यायचाच आहे. ते या शहराचे नारिक आहेत. त्यांच्याकडून आपण सर्वप्रकारचे कर घेत असतो आणि ३५ एम.एल.डी. पाण्यापैकी संपूर्ण ३५ एम.एल.डी. पाणी आपल्याला मिळो. याच्यामध्ये आपल्याला महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे फार मोठे सहकार्य मिळत आहे. आपण ज्या सुचना केलेल्या आहेत. त्या सर्व सुचनांचा सन्मान केला जाईल. त्यावर अंमलबजावणी केली जाईल. कारण आपण ज्या सुचना केलेल्या आहेत त्या सगळ्या सुचना शहराच्या हितासाठी केलेल्या आहेत. जर आपल्याला हे जे पाणी येणार आहे. ते आपण उल्हास नदी मधूनच घेणार आहोत. जे पाणी आपल्याला उल्हास नदीमधूनच मिळते. आपण शहाड टेमघर योजनेतूनच शहाड येथून ते पाणी उचलतो. परंतु, हे पाणी जांभूळ येथून घेणार आहेत. साकेत येथे आपली पाईपलाईन आणि त्यांची पाईपलाईन एकत्र आहेत. आपल्या बोलण्यातून मला एक गोष्ट बरोबर वाटली नाही की, आपण म्हणता की, टलाईन एम.आय.डी.सी. ची पाईपलाईन आहे. आपल्याला तिथून बरोबर पाणी मिळणार नाही. परंतु, सन्मा. सदस्य श्री. प्रफुल्ल पाटील साहेब, ती पाईपलाईन साकेत येथील टेलाईन नाही. त्यांची अजून पूढे लाईन येते आणि आपल्याला .........

**प्रफुल्ल पाटील :-**

मी शांतीनगरच्या बाबतीत बोललो होतो. टेलाईनला नाही.

**मा. उपमहापौर :-**

शांतीनगरच्या बाबतीत प्रॉब्लम होता. त्यांना ५ एम.एल.डी. पाणी मंजुर होते. २ एम.एल.डी., २.५ एम.एल.डी. पाणी मिळत होते. ते ५ एम.एल.डी. पाणी आपण आपल्याकडे वर्ग करुन घेतलेले आहे आणि संपूर्ण ५ एम.एल.डी. पाणी आपल्याकडे वर्ग करुन घेतलेले आहे. आपण तिथे जर पंप लावले तर त्यांचे आणि हे सगळे करतांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणला स्टीम ॲथोरिटीला पूर्ण विश्वासात घेतल्याशिवाय आपल्याला काही करता येणार नाही. कारण ते खऱ्या अर्थाने त्या विषयात ते तज्ञ आहेत. तर हे जे पाणी आलेले आहे ते पाणी लवकरात लवकर शहराला मिळावे. ज्यादिवशी आमची मिटींग सुरु होती. त्यादिवशी श्री. अशोकराव चव्हाण साहेबांनी आपल्या मा. आयुक्त साहेबांना सागितले की, आपण तातडीने मा. महासभेमध्ये हा विषय घ्या. आम्हाला तसा आवश्यक मंजुरीसाठी जो ठराव असतो, आपला तो ठराव आला पाहिजे. तर त्यावेळेला मी सांगितले होते की, आमची सभा ऑलरेडी डिक्लेअर केलेली आहे. त्याचा गोषवारा देखील तयार झालेला आहे.

मग त्यांनी त्यावर सांगितले की, आपण त्या आधीही विशेष सभा घेवू शकता आणि त्यानुसार विशेष सभा घेतली गेली. आपल्याला काही फॉर्मालीटीझ आहेत. आता हे जे करार होणे ह्या हिताच्या गोष्टी आहेत. आज आपल्या मा. महासभेचा ठराव झाला. म्हणजे ह्यामध्ये एम.आय.डी.सी. आणि आपल्या मधले जे काही अंतर होते ते अंतर संपलेले आहे. त्यामुळे पुढील कागदपत्रे बनण्यासाठी, करार बनण्यासाठी आपल्याला कुठच्याही प्रकारची अडचण येणार नाही. त्यात आर्थिक, प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे. त्याच्यामुळे खर्चाचीही कुठे तजबीजेला अडचण राहणार नाही आणि एखादा रुम भाड्याने घेताना आपण काही रक्कम त्यांच्याकडे डिपॉझीट म्हणून जमा करत असतो. आणि आपल्याला सुदैवाने डिपॉझीट हे तीन महिन्यांचे आहे. ही एक चांगली गोष्ट आहे. मी संपूर्ण सभागृहाचे देखील, सगळ्यांचे अभिनंदन झाले. परंतु, यासगळ्यांचे आणि या मिरा भाईंदर महानगरपालिकेतील मा. आयुक्तांचे, सर्व कर्मचाऱ्यांचे देखील अभिनंदन करतो.

**रोहिदास पाटील :-**

त्या ठरावामध्ये दुरुस्ती करा. अभिनंदन करत असताना एखाद्या पक्षाचे, नेत्याचे नाही तर त्यात एम.आय.डी.सी. चे जे अधिकारी आहेत. त्यांनी कुठेतरी चावी मारली तर तुम्हाला पाणी मिळणार नाही. एम.जी.पी. चे घ्या. संबंधित अधिकारी आहेत. प्रशासकीय अधिकारी आहेत. त्यांना बरोबर घेतल्याशिवाय कामे होत नाही. हे तुमच्या नीट लक्षात येत नाही आणि त्यामुळे कामे लेट होतात.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, यामध्ये मला मा. आयुक्त साहेबांचा खुलासा पाहिजे होता की, यामध्ये अये म्हटले आहे की, ३५ एम.एल.डी. पाणी देण्याचे सॅक्शन झालेले आहे. परंतु, ती लोक आपल्याला ३० एम.एल.डी. पाणी देणार आहेत आणि परत त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, दुरुस्तीची कामे पूर्ण होईपर्यंत ३० दशलक्ष पेक्षा कमी पाणी पुरवठा महानगरपालिकेला होणार आहे. आपण जी बिले देणार आहेत. ती बिले ३० एम.एल.डी. पाण्यासाठी देणार आहेत की ३५ एम.एल.डी. पाण्यासाठी देणार आहोत? की ॲक्च्युअल आलेले आहे ते देणार आहे?

**शिवाजी बारकुंड :-**

मीटर लावणार आणि त्यानुसार पाणी देणार.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

म्हणजे मीटर लागणार आणि त्या मीटरनुसार पाणी देणार आहोत.

**मा. महापौर :-**

विषय सर्वानुमते मंजुर.

**प्रकरण क्र. १३ :-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून मिरा भाईंदर महानगरपालिकेस वाढीव पाणी पुरवठा करण्यासाठी प्राप्त झालेले पत्र व सदर कामाचे अंदाजपत्रकास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देणेबाबत विचार विनीमय करणे.

**ठराव क्र. ०३ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेस अतिरिक्त पाणी पुरवठा मिळणेबाबत शासन स्तरावर पत्रव्यवहार चालू होता. दि. ०३/१०/२००६ रोजी मिरा भाईंदर शहराला वाढीव पाणी पुरवठा उपलब्ध करून देण संदर्भात मा. मंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग तसेच जलसंपदा विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक होउन ठाणे येथील साकेत संकुला जवळील एम.आय.डी.सी. च्या पाईपलाईन मधून ३५ द.ल.लि. जास्तीचे पाणी मिरा भाईंदर शहराला उपलब्ध करून देणेचे ठरले.

तद्नंतर मा. मंत्री (उद्योग व अध्यक्ष महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ) यांचेकडील बैठकित झालेल्या निर्णयानुसार व दि. ०९/०४/२००७ रोजी महामंडळाच्या संचालक मंडळाने मंजुर केल्यानुसार मुख्या अभियंता (मुख्यालय) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई - ९३ यांचेकडील पत्र क्र. जा.क्र./मुअ(मु)/५७७/२००७ मुख्य अभियंता यांचे कार्यालय, मऔविम, मुंबई - ९३ दि. ११/०४/२००७ अन्वये मिरा भाईंदर शहरास ३०द.ल.लि. अतिरिक्त पाणी पुरवठा करणेबाबतचे पत्र दिलेले आहे.

सदर कामी मजीप्रातील अधिकारी व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अधिकारी यांच्यासमवेत केलेल्या कामाच्या तांत्रिक बाबींच्या चर्चेनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून त्याची अंदाजित किंमत रू. ३,८०,८४,२०५/- एवढी होत आहे. सबब सदर खर्चास प्रशासकिय व वित्तीय मान्यता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत न करता महानगरपालिकेमार्फत करणेस ही महासभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. हॅरल बोर्जीस.** **अनुमोदन :- ॲड. एस.ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आपण चांगल्याप्रकारे सहकार्य केले त्यासाठी आपणा सर्वांना मी धन्यवाद देते.

**अनंत पाटील :-**

शोक प्रस्तावाचा ठराव :- कै. सदानंद वामन पाटील हे राई गावातील प्रतिष्ठित नागरिक वारले. त्यांच्या संदर्भात बोलतो.

**शशिकांत भोईर :-**

आमच्या गावात कै. रजनी द्वारकानाथ पाटील यांचेही निधन झालेले आहे आणि तसेच पूर्ण नाव मी नंतर देतो. कै. धोत्रे म्हणून आहेत. त्यांचेही निधन झालेले आहे. तर याची शोकसभेमध्ये नोंद करावी.

**गजानन भोईर :-**

नवघर येथील स्वातंत्र्य सैनिक अनंत रोहिदास पाटील यांची पत्नी भागीबाई अनंत पाटील यांचेही निधन झालेले आहे.

**रोहित सुवर्णा :-**

भाईंदर पश्चिम येथील जय अम्बे नगर झोपडपट्टी क्र.२ येथील रामचंद्र पेंटर नावाचे नागरिक त्यांचे देखील निधन झालेले आहे.

**नगरसचिव :-**

निधन झालेल्या व्यक्तींसाठी श्रध्दांजली वाहण्यासाठी सर्वांनी २ मिनीटे उभे रहायचे आहे.

(सभागृहात दोन मिनीटांकरिता शांतता राखण्यात आली.)

**दुःखवटा ठराव ०५ :-**

आपल्या राई गावातील प्रतिष्ठित नागरिक कै. सदानंद वामन पाटील, खारीगावातील कै. रजनी द्वारकानाथ पाटील, नवघर गावातील स्वातंत्र्य सैनिक अनंत रोहिदास पाटील यांची पत्नी भागीबाई अनंत पाटील तसेच भाईंदर पश्चिम येथील जय अम्बे नगर झोपडपट्टी क्र.२ येथील रामचंद्र पेंटर यांचे दुखःद निधन झालेले आहे.

तरी या सर्व मृतात्म्यांच्या कुटूंबियांच्या दुःखात ही महासभा सहभागी आहे. देव त्यांच्या मृतात्म्यास चिरशांती देवो ही प्रार्थना करून दुःखवटा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रतन पाटील.** **अनुमोदन :- श्रीम. संगिता म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, अधिकारी वर्ग व कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे आभार मानून आजची ही सभा संपल्याचे मी जाहिर करित आहे.

**सभा संपल्याची वेळ :- सायं. ६.४० वा.**

**सभा तहकुब झाल्याची वेळ :- सायं :- ५.१० वा.**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**